दैनिक
जन-संग्राम
वर्धा, शुक्रवार दि.२३ ऑक्टोबर २०२६
४

श्वानांची पिल्ले पॉलिथिनमध्ये भरून रस्त्यावर सोडली

वर्धा : शहरातील धंतोली परिसरात अज्ञात व्यक्तीने श्वानांची लहान पिल्ले पॉलिथिनमध्ये भरून रस्त्याच्याकडेला सोडून दिल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. रस्त्याच्याकडेला पडलेल्या पॉलिथिनमधून एकामागून एक लहान पिल्ले बाहेर आली. त्यानंतर ही पिल्ले आरडाओरड करीत रस्त्यावर धावू लागली. या मार्गावरून भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनांसमोर अचानक पिल्ले येत असल्याने वाहनचालकांची तारांबळ उडाली. पिल्लांना वाहनांची धडक बसण्याची शक्यता निर्माण झाल्याने अनेकांच्या काळजाचा ठोका चुकला. या प्रकारामुळे मुक्या प्राण्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. मुक्या जीवांशी अशा प्रकारे निर्दयतेने वागणे संतापजनक असून, संबंधित व्यक्तीने पिल्ल्यांना रस्त्यावर सोडण्याऐवजी त्यांच्या संगोपनाची योग्य व्यवस्था करणे आवश्यक होते. या घटनेमुळे परिसरात संताप व्यक्त होत असून, मुक्या प्राण्यांप्रती संवेदनशीलता दाखविण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

दुर्गा विसर्जनानंतर नदीत ठिकठिकाणी निर्माल्य, प्लॅस्टिक आणि सजावटीच्या साहित्याचा खच

प्रतिनिधी/दै.जन-संग्राम

वर्धा : पवनार येथील धाम नदीची दुर्गा विसर्जनानंतर दयनीय अवस्था झाली आहे. नदीत ठिकठिकाणी निर्माल्य, प्लॅस्टिक आणि सजावटीच्या साहित्याचा खच साचल्याने नदी अक्षरशः गटारासारखी दिसु लागली आहे. विशेष म्हणजे कमी पाणी असलेल्या या नदीत आता देवीचे सांगाडेही उभे आहेत. नऊ दिवस आराधना करताना विसर्जनानंतर देवीची विटंबना होताना दिसत आहे.

उत्सवानंतर नदीत साचणारे निर्माल्य आणि टाकाऊ साहित्य यामुळे नदीच्या स्वच्छतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. विसर्जनानंतर नदीच्या पाण्यात आणि काठावर प्लॅस्टिकच्या पिशव्या, फुले, सजावटीचे अवशेष तसेच इतर कचरा विखुरलेला आहे. काही भागात देवीचे लाकडी सांगाडेही उभे आहेत. नदीचे धार्मिक महत्त्व जपले जात असताना तिच्या स्वच्छतेकडे मात्र दुर्लक्ष होते.

दुर्गामूर्तींच्या विसर्जनादरम्यान मोठ्या प्रमाणावर निर्माल्य आणि इतर कचरा जमा होण्याची शयता प्रशासनाला माहीत असते. मात्र, विसर्जनापूर्वी निर्माल्य संकलन, स्वतंत्र कचरापेट्या आणि कचर्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी पुरेशी व्यवस्था का करण्यात आली नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांच्या नियोजनावरच प्रश्न उपस्थित होत आहे. गणेश विसर्जनाकरिता स्वतंत्र कुंड तयार केला असताना पाणी टंचाईच्या काळात दुर्गा विसर्जनाकरिता त्याच कुंडाचाच वापर करण्याचे निर्बंध प्रशासनाच्या

वतीने का टाकण्यात आले नाहीत.

प्लॅस्टिक आणि इतर टाकाऊ साहित्यामुळे नदीला धोका निर्माण होऊ शकतो. नदीच्या पाण्याचा वापर कोणत्या कारणांसाठी केला जातो, यानुसार नागरिकांच्या आरोग्याचाही प्रश्न महत्त्वाचा आहे. त्यामुळे धाम नदीतील प्रदूषणाकडे केवळ स्वच्छतेची समस्या म्हणून न पाहता पर्यावरणाच्या दृष्टीने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

विसर्जनानंतर नदीपात्रात कचरा साचण्याची समस्या दरवर्षी उद्भवत असेल, तर त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना का होत नाहीत, असा सवाल उपस्थित होत आहे. दुर्गामूर्तींच्या विसर्जनानंतर पवनार येथील धाम नदीत निर्माल्य, प्लॅस्टिक आणि सजावटीच्या साहित्याचा खच साचला आहे. दरवर्षी अशीच स्थिती निर्माण होत असतानाही प्रशासनाकडून कायमस्वरूपी उपाययोजना होताना दिसत नाही.

शिवाजी चौक वाचवा!

दुर्गादेवी स्थापनेला मंडपात घेऊन जाताना काढण्यात आलेल्या मिरवणुकीत आणि दोन दिवसांपासुन सुरू असलेल्या विसर्जन मिरवणुकीत तोफेतुन उडवण्यात आलेले चिटोरे कागदं शहरात सर्वत्र विखुरलेले आहे. याशिवाय छत्रपती शिवाजी महाराज या मिरवणुकांचा समारोप होताना मोठ्या प्रमाणात या भागातही गुलाल, उडवण्यात येणारी कागदं, झिल्ली, पाण्याच्या बॉटल, लंगरमधील द्रोण त्याच ठिकाणी पडुन असतात. त्यामुळे शिवाजी महाराजांवर प्रेम करणार्या काही मावळ्यांनी हातात फलकं घेऊन शिवाजी महाराज चौक स्वच्छ ठेवा असे आवाहन करणारे फलकं घेऊन हॉटेल राधिका पुढे उभे असल्याने देवी मंडळांच्या सदस्यांमध्ये झणझणीत अंजन घातले.

हिंगणघाटात नऊ दिवस झाली श्रीदुर्गा माता दौड!

प्रतिनिधी/दै.जन-संग्राम

हिंगणघाट : स्थानिक श्रीदत्त मंदिर देवस्थान येथून ११ ऑटोबर ते २० ऑटोबर दरम्यान दररोज सकाळी ६ वाजता शहरात श्रीदुर्गा माता दौडचे आयोजन करण्यात आले होते. ही दौड शहरातील विविध दुर्गामाता मंदिरांपर्यंत काढण्यात आली. या दौडमध्ये शेकडो धर्मप्रेमी आणि श्रीशिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या धारकर्यांनी सहभाग घेतला.

या दौडचे विशेष आकर्षण म्हणजे, कार्यक्रमादरम्यान राष्ट्रप्रेमाचा अनोखा आदर्श घालून देत रोशन नागमोते यांची एक महिन्यांची मुलगी जिजाई, संदीप भोयर यांचा दोन महिन्यांचा मुलगा शिव आणि राकेश कवडे यांची एक महिन्यांची मुलगी मुक्ताई यांना 'देव, देश आणि धर्मासाठी' समर्पित करण्यात आले. या देशप्रेमी निर्णयाचे उपस्थितांकडून प्रचंड कौतुक करण्यात आले.

या सोहळ्याला वर्धा जिल्हा संघचालक जेठानंद राजपूत, नगराध्यक्ष नयना तुळसकर, नगरसेवक प्राची पाचखेडे, माजी नगरसेवक उमेश तुळसकर, डॉ. मोहन खेतल, वैशाली खेतल, डॉ. गंगाधर नाखले, सुरेश दविले, भारत स्वाभिमान वर्धा जिल्हा अध्यक्ष वसंत पाल, विहिंप प्रांत अध्यक्ष सुरेंद्र आगरे, विश्व हिंदू परिषद महामंत्री शरद कोनपत्तीवार, प्रशासकीय अधिकारी विशाल ब्राह्मणकर आणि ज्ञानेश्वर खडसे उपस्थित होते.

नगराध्यक्ष नयना तुळसकर यांनी आपली समृद्ध हिंदू संस्कृती आणि परंपरांचे रक्षण करण्यासाठी हिंदू समाजाने नेहमीच सतर्क व तत्पर राहणे काळाची गरज असल्याचे त्या म्हणाल्या. वसंत पाल यांनी युवकांनी आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि आरोग्यासाठी व्यसनांचा सदैव त्याग करण्याचे आवाहन केले.

वाघाच्या हल्ल्यात चार वासरे ठार

एकाला वाघाने नेले ओढून आजनदेवी शिवारातील घटना

प्रतिनिधी/दै.जन-संग्राम

आष्टी (श.) : आजनदेवी शेतशिवारात वाघाने हल्ला करून चार वासरांना ठार केल्याची घटना २८ ऑक्टोबरला पहाटे घडल्याचा अंदाज आहे. यामध्ये तीन वासरे घटनास्थळीच मृतावस्थेत आढळली, तर एका वासराला वाघाने उचलून जंगलाच्या दशेने पळ काढला. या घटनेमुळे पशुपालक गौरव धनराज किनकर यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले व परिसरातील पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गौरव धनराज किनकर यांच्या मालकीच्या गाई व म्हशींचा कळप आहे. घरी जनावरांना बांधण्यासाठी पुरेशी जागा नसल्याने त्यांनी शेतात गोठा तयार करून जनावरे बांधण्याची व्यवस्था केली होती. नेहमीप्रमाणे १७ ऑक्टोबर रोजी त्यांनी गाई-म्हशींचा कळप गोठ्यात बांधला आणि ते घरी परतले. रात्रीच्या सुमारास गोठ्यात शिरलेल्या वाघाने गाईच्या चार वासरांवर हल्ला केला. या हल्ल्यात तीन वासरे जागीच ठार झाली, तर चौथ्या वासराला वाघाने उचलून जंगलाच्या दिशेने पळ काढला. सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती वनविभागाला देण्यात आली. वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या हल्ल्यामुळे किनकर यांचे आर्थिक नुकसान झाले असून, वनविभागाने नुकसानीची भरपाई देऊन आर्थिक मदत करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

'द व्हॉइस ऑफ ओल्ड' लघुपटाच्या बालकलाकार आणि दिग्दर्शकाचा सत्कार

प्रतिनिधी/दै.जन-संग्राम

वर्धा : 'द व्हॉइस ऑफ ओल्ड' या लघुपटाचा बालकलाकार सार्थक चव्हाण व दिग्दर्शक व निर्माते आदेश ढगे यांचा केळकरवाडी येथील सरस्वती विद्या मंदिर मराठी माध्यम उच्च प्राथमिक शाळेत सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे बालकलाकार सार्थक चव्हाण हा सरस्वती विद्या मंदिरचा विद्यार्थी आहे.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष प्रकाश देशपांडे, सचिव संजय जलताडे, कोषाध्यक्ष मदन परसोडकर व मुख्याध्यापक दिनेश शेंडे उपस्थित होते.

वर्धा जिल्ह्यातील ग्रामीण भागातून सुरू झालेला या चित्रपटाचा

कलाप्रवास सातासमुद्रापार पोहोचला आहे. ही शाळेसाठी व संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. या लघुपटातील बालकलाकार सार्थक चव्हाण हा सरस्वती विद्यालयातील सहावीचा विद्यार्थी आहे. सार्थकने आपल्या अभिनयाने विशेष छाप पाडली आहे. कमी वयात सार्थकने आपल्या अभिनयातून प्रसिद्धी मिळविली आहे. त्याच्या यशाचा आम्हाला अभिमान असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

वर्धा नगर परिषदेने दिले नगराध्यक्ष व सभापतींना नोटीस

मालमत्तेचे विवरण व बांधकाम परवाना सादर करण्याचे निर्देश

प्रतिनिधी/दै.जन-संग्राम

वर्धा : येथील नगर परिषदेच्या नगररचनाकार विभागाने नगराध्यक्ष सुधीर पांगुळ व बांधकाम सभापती राखी पांडे यांना नोटीस बजावून वर्धा शहराच्या हद्दीत येणाऱ्या मालमत्तेचे विवरण पत्रक व मालमत्तेवर झालेला बांधकामाचा परवाना, तसेच सातबारा 'क' प्रत, प्रॉपर्टी कार्ड इत्यादी कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

वर्धा नगर परिषदेत प्रथमच नगर परिषदेतील नगररचनाकार विभागाने नगराध्यक्ष व सभापतींना नोटीस दिल्याची आश्चर्यजनक घटना आहे. नगररचनाविभागाने याअगोदर नऊ नगरसेवकांना नोटीस बजावली होती. यावेळी

नगर परिषदेत काँग्रेसचे नगराध्यक्ष सुधीर पांगुळ हे विराजमान असून, इतर सत्ताधारी पक्षांची सभापती व नगरसेवकांची संख्या जास्त आहे. अनेक दिवसांपासून या वर्धा नगर परिषदेमध्ये राजकीय कुजबूज सुरू असून श्रेयवादावरून वाद सुरुच आहे. कोणत्याही कामाची विचारणा किंवा तक्रार केली तर नोटीस मिळतो, अशीच चर्चा नगर परिषदेमध्ये केल्या जात कोणतीही बैठक झालेली नाही. आता या नोटीसाच्या प्रकरणानंतर आचारसंहिता संपल्यावर नगर परिषदेच्या सभागृहात होणाऱ्या बैठकीत पदाधिकारी अधिकाऱ्यांवर काय ताशेरे ओढतात व कोणती तक्रार करतात, याकडे अनकांचे लक्ष लागले आहेत.

जिल्ह्यात विविध बाबी घडत असताना याकडे जिल्हा प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहेत, वेळीच तक्रारीचे निवारण वेळेवर केल्या जात नाही. तसेच त्याची योग्य दखल घ्यायला वरिष्ठ अधिकारी तयार नाही. जिल्ह्याचा कारभार वाऱ्यावर सोडल्यासारखा असून, जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे याकडे दुर्लक्ष होत आहे.

हिंगणघाट बसस्थानकात एसटी चालक व वाहकाला मारहाण; तिघांना अटक

प्रतिनिधी/दै.जन-संग्राम

हिंगणघाट : आर्वी ते चंद्रपूर मार्गावर धावणाऱ्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसमध्ये महिला प्रवाशासोबत झालेल्या वादातून हिंगणघाट बसस्थानकात चालक आणि वाहकाला मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. या मारहाणीत वाहकाच्या नाकाला दुखापत झाली असून चालकही किरकोळ जखमी झाला आहे. परिवहन मंडळाच्या सूत्राने दिलेल्या माहितीनुसार, याप्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक केली आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वर्धा विभागातील आर्वी आगाराची बस क्रमांक एमएच १४ एलएक्स ८५४० ही नियत क्रमांक ९३/९४



नुसार आर्वी ते चंद्रपूर मार्गावर प्रवासी वाहतूक करीत होती. २१ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजता ही बस हिंगणघाट बसस्थानकावर पोहोचली. परिवहन मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, बसमधील एका महिला प्रवाशाने चालक आणि वाहक यांनी त्रास दिल्याचे सांगून तीनजणांना बोलावून घेतले. संबंधितांनी घटनेची शहानिशा न करता चालक आणि वाहकाला मारहाण करण्यास सुरुवात केल्याचे महामंडळाच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. या मारहाणीत वाहक शुभम ज्ञानेश्वर डहाके यांच्या नाकाला दुखापत झाली, तर चालक गणेश मनोहर खेळकर यांना किरकोळ दुखापत झाली. घटनेनंतर हिंगणघाट पोलीस ठाण्याला माहिती देण्यात आली.

पोलिसांनी या प्रकरणातील तिन्ही आरोपींना अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. एसटी बसमधील वादाचे पर्यावसान चालक आणि वाहकाला मारहाण करण्यात झाल्याने कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. प्रवाशांच्या तक्रारींची योग्य चौकशी होणे आवश्यक असतानाच, कायदा हातात घेण्याच्या घटनांमुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त होत आहे.

विहिरीत पडल्याने मृत्यू

वर्धा : विहिरीत पडल्याने इसमाचा मृत्यू झाला. ही घटना १० ऑक्टोबर रोजी विरुळ येथे घडली. लक्ष्मण केरवतकार असे मृतकाचे नाव आहे. विहिरीत पडल्याने त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी पुलगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली.

भरधाव कंटेनरची चार वाहनांना धडक

प्रतिनिधी/दै.जन-संग्राम

वर्धा : भरधाव आणि निष्काळजीपणे कंटेनर चालवून चालकाने रस्त्याच्याकडेला उभ्या असलेल्या चार वाहनांना धडक दिली. या अपघातात चारही वाहनांचे मिळून सुमारे २ लाख ९५ हजार रुपयांचे नुकसान झाले. ही घटना वायगाव (नि.) येथील डॉ. लोखंडे यांच्या दवाखान्यासमोरील मुख्य रस्त्यावर घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी आपल्या भावाला उपचारासाठी वायगाव (नि.) येथील डॉ. लोखंडे यांच्या दवाखान्यात घेऊन गेले होते. त्यांनी आपले वाहन दवाखान्यासमोरील रस्त्यावर उभे केले होते. यावेळी त्यांच्या वाहनाशेजारी अन्य तीन वाहनेही उभी होती. फिर्यादी दवाखान्याबाहेर उभे असताना सीजी २२ छत्तीसगड पासिंगचा एजे ८९२२ क्रमांक असलेला कंटेनर तेथे आला. कंटेनरचालक भगतसिंग दसरू जाळे रा. सालई, ता. देवरी, जि. गोंदिया याने वाहन भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालविल्याने प्रथम एमएच ३२ एएन ७५२४ क्रमांकाच्या दुचाकीला धडक दिली. यात दुचाकीचे ६० हजार रुपयांचे नुकसान झाले. त्यानंतर दुसऱ्या एमएच ३२ एएफ ८११९ क्रमांकाच्या दुचाकीला धडक बसल्याने ३५ हजार रुपयांचे नुकसान झाले. पुढे फिर्यादी यांच्या एमएच ३२ एपी ५३४१ क्रमांकाच्या मोपेडला धडक बसली. यात ५० हजार रुपयांचे नुकसान झाले. त्यानंतर कंटेनरने एमएच ४० एआर ९१३२ क्रमांकाच्या कारला धडक दिली. यात कारचे दीड लाख रुपयांचे नुकसान झाले. अशाप्रकारे चारही वाहनांचे मिळून २ लाख ९५ हजार रुपयांचे नुकसान झालेत. याप्रकरणी फिर्यादीच्या तोंडी तक्रारीवरून कंटेनरचालकाविरुद्ध भारतीय न्यायसंहिता कलम २८१, ३२४ (५) तसेच मोटार वाहन कायद्याच्या कलम १८४ व १८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास देवळीचे ठाणेदार संदीप कापडे यांच्या मार्गदर्शनात सुरू आहे.

शेतकऱ्यांनी तारण कर्ज योजनेचा लाभ घ्यावा- ॲड. कोठारी

प्रतिनिधी/दै.जन-संग्राम

हिंगणघाट : येथील बाजार समितीत सोयाबीन तारण योजनेचा शुभारंभ २६ ऑक्टोबर रोजी होणार असून शेतकऱ्यांनी तारण कर्ज योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सभापती ॲड. सुधीर कोठारी यांनी केले आहे.

जिल्ह्यात सोयाबीन पिकाच्या पेरणीपासून काढणीपर्यंत आवश्यक टप्प्यांवर पाऊस झाल्याने यंदा सोयाबीनचे उत्पादन समाधानकारक राहिले आहे. सध्या सोया पेंड व खाद्यतेलाच्या मागणीमुळे सोयाबीनच्या बाजारभावाला आधार मिळत असून, खुल्या बाजारात सोयाबीनला शासनाने निश्चित केलेल्या किमान आधारभूत किमतीपेक्षा अधिक दर मिळत आहे. दुसरीकडे, अनियमित पावसामुळे कापूस पिकाच्या उत्पादनावर परिणाम झाल्याने सोयाबीन विक्रीवर अवलंबून राहावे लागत आहे. त्यामुळे अनेक शेतकरी सध्या सोयाबीन विक्रीला प्राधान्य देत आहेत. मात्र, सध्याच्या बाजारभावापेक्षा भविष्यात अधिक भाव मिळण्याची अपेक्षा असलेल्या

ज्या शेतकऱ्यांना शेतमाल विकायचा नाही, परंतु पैशाची निकड असल्यामुळे किंवा घरी शेतमाल साठवणुकीच्यादृष्टीने पुरेशी सुविधा उपलब्ध नसल्यामुळे शेतमाल विकावा लागत आहे, अशा शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळावा या उद्देशाने बाजार समितीमार्फत सन १९९२ पासून शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्यात येत आहे. बाजार समितीकडील गोदामामध्ये फक्त सोयाबीन या शेतमालाची साठवणूक करण्यात येत असून त्यावर आधारभूत दर किंवा प्रचलित बाजार दर यापैकी जे कमी असेल त्याच्या ७० टक्के पावेतो रक्कम तारण कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. विशेष म्हणजे, या सुविधेंतर्गत शेतकऱ्याला गोदाम भाडे व हमालीचा खर्च करावा लागत नसून, सदर संपूर्ण खर्च बाजार समितीमार्फत करण्यात येतो. तसेच गोदामात साठविलेल्या सोयाबीनची विक्रीसुद्धा बाजार समितीमार्फत केली जाते. बाजार समितीच्या वतीने हंगाम २०२६-२७ मधील सोयाबीन तारण कर्ज योजनेचा शुभारंभ सोमवार, २६ ऑक्टोबर रोजी स. ११ वाजता छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड येथील तारण गोदामात करण्यात येणार आहे, अशी माहिती सभापती ॲड. सुधीर कोठारी यांनी दिली.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकाची नोंद असलेला चालू वर्षाचा सातबारा उतारा, आधार कार्डची सत्यप्रत व बँक पासबुकची सत्यप्रत, इत्यादी आवश्यक कागदपत्रांसह बाजार समितीकडे तारण कर्ज मागणीचा प्रस्ताव सादर करावा व या सुविधेचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. यावेळी उपसभापती हरीश वडतकर, संचालक मधुकर डंभारे, मधुसूदन हरणे, ओमप्रकाश डालिया, प्रफुल्ल बाडे, उत्तम भोयर, अशोक उपासे, राजेश मंगेकर, डॉ. निर्मेश कोठारी, घनश्याम येरलेकर, पंकज कोचर, संजय कातरे, शुभ्रबुद्ध कांबळे, हर्षद महाजन, ज्ञानेश्वर लोणारे, माधुरी चंदनखेडे, नंदा चांभारे व सचिव टी. सी. चांभारे उपस्थित होते.

सिंदीत श्री गजानन महाराजांच्या मूळ पादुकांचे दर्शन आजपासून

प्रतिनिधी/दै.जन-संग्राम

सिंदी (रे.) : शहरातील बाजार चौक येथील श्री गणपती मंदिर देवस्थानात शुक्रवार, २३ आणि शनिवार, २४ ऑक्टोबर रोजी श्री सद्गुरु गजानन महाराजांच्या मूळ पादुकांच्या दर्शनाचा दुर्मीळ योग भाविकांना लाभणार आहे. या निमित्ताने दोन दिवस धार्मिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवारी सायंकाळी ५ वाजता ढोल-ताशांच्या गजरात पादुकांचे आगमन होणार आहे. सायंकाळी ६ वाजता हरिपाठ, तर ७.१५ वाजता नैवेद्य व महाआरती होणार आहे. तर शनिवारी पहाटे काकडा व आरतीने धार्मिक कार्यक्रमांना प्रारंभ होईल. सकाळी ६ वाजता पादुकांचा अभिषेक, तर ७ वाजता श्री पादुकांची नगर प्रदक्षिणा व शोभायात्रा काढण्यात येईल. सकाळी १०.४५ वाजता मंदिरात पादुका आगमन व महाआरती, तर ११ वाजता नैवेद्य महाआरती होईल. सायंकाळी हरिपाठ, महाआरती व पादुका प्रस्थानानंतर सायंकाळी ७.३० वाजेपासून महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे.

यावेळी श्री गजानन महाराज पादुका संस्थान, श्रीक्षेत्र मुंडगाव, जि. अकोला येथील संस्थान पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. तर शनिवारी दुपारी ३ वाजता नागपूर येथील जयंत बेलगावकर यांचे 'श्री गजानन अनुभूती' या विषयावर कथन होणार आहे.

तेलीपुरा येथे ४६ भाविकांचे लोटांगण; दोनशे वर्षांची परंपरा आजही कायम

प्रतिनिधी/दै.जन-संग्राम

आष्टी (श.) : शहरातील तेलीपुरा येथील नवयुवक मातामाय दुर्गा उत्सव मंडळाच्या वतीने आयोजित लोटांगण उत्सवाला यंदा भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ४६ भाविकांनी ५०० मीटर अंतरापर्यंत लोटांगण घालून मातामाय देवीच्या चरणी आपली श्रद्धा अर्पण केली.

१९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता भक्तिमय वातावरणात हा सोहळा पार पडला. हा अनोखा भक्तिपर सोहळा पाहण्यासाठी हजारोंच्या संख्येने भाविकांनी गर्दी केली होती. तेलीपुरा येथे दुर्गादेवीची स्थापना करण्याची दोनशे वर्षांपासूनची परंपरा आजही श्रद्धेने जपली जाते. नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत देवीची विधिवत पूजाअर्चा, भजन-कीर्तन आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यंदाही नवयुवक मातामाय दुर्गा उत्सव मंडळाच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

हभप प्रमोद सातपुते महाराज उर्फ लोटांगण महाराज यांच्या उपस्थितीत हा लोटांगण सोहळा पार पडला. नऊ दिवसांच्या धार्मिक कार्यक्रमांची सांगता होत असताना देवीच्या चरणी मनोकामना व्यक्त करण्यासाठी आणि मनातील इच्छा पूर्ण व्हाव्यात, या श्रद्धेने भाविकांनी लोटांगण घातले. योग आणि प्राणायामाचे महत्त्व अधोरेखीत करण्याचाही या उपक्रमामागील उद्देश असल्याचे सांगण्यात आले. दुर्गादेवीचे दर्शन घेतल्यानंतर भाविकांनी ५०० मीटर अंतर लोटांगण घालत पार केले. यावेळी भजन मंडळाच्या सदस्यांनी भजन सादर केले. भजनाच्या तालावर आणि जयघोषात भाविक भक्तिरसात तल्लीन झाले होते.

दै. जन-संग्राम हे वृत्तपत्र मालक श्रीमती निर्मला अशोक त्रिपाठी व संपादक, प्रकाशक, मुद्रक श्री. निरज त्रिपाठी यांनी जन-संग्राम ऑफसेट प्रिन्टर्स, गोंडप्लॉट, आर.टी. रोड, वॉर्ड नं.२०, वर्धा येथे मुद्रीत करुन जन-संग्राम कार्यालय, गोंडप्लॉट, आर.टी. रोड, वॉर्ड नं.२०, वर्धा येथे प्रकाशित केले. (मो.) ९८२२३६७६८६